**महाराष्ट्र शासन**
**वि.**
**सैय्यद समीर सैय्यद बशीर व इतर**
**(CNR NO. MHBU20-000097-2026)**

## नि.क्र. ७ खाली आदेश
## (पारीत दिनांक ३१ मार्च २०२६)

०१] अर्जदार क्र. **(१) आरेफाबी सय्यद मंजुर, (२) फरीदाबी सय्यद जमीर** आणि **(३) सुलताना बी सैय्यद रहीम** यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, डोणगाव येथील अपराध क्र. २९५/२०२५, कलम १०३(१), १०९(१), १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), २९६, ३५१(२) सह कलम १९० भारतीय न्याय संहिता खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार दिनांक १०.११.२०२५ रोजी फिर्यादी विकार खाँ जाबीर खॉ पठाण व त्याचे नातेवाईक हे त्यांचे अंजनी बुद्रुक शिवारातील शेता मध्ये हळदीच्या पिकात निंदन करण्यासाठी गेले होते. दुपारी ०३.३० वाजेच्या सुमारास आरोपी सैय्यद मंजुर सैय्यद बिराम व त्याचे साथीदार आरोपी सैय्यद समीर सैय्यद बशीर, सैय्यद सलमान सैय्यद जमीर, सैय्यद आसिफ सैय्यद मंजुर, सैय्यद रफिक सैय्यद मुनाफ, सैय्यद रहीम सैय्यद बिराम, सैय्यद इमरान सैय्यद रहीम, आरेफाबी सय्यद मंजुर, फरीदाबी सय्यद जमीर आणि सुलतानाबी सैय्यद रहीम हे लोखंडी रॉड व लाकडी काठ्या घेवुन आले. आरोपींनी फिर्यादीला, त्याचे आई-वडिलांना आणि नातेवाईकांना शिवीगाळ करून धमकी दिली आणि लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण करुन गंभीर जखमी केले. आरोपी सैय्यद समीर सैय्यद बशीर, आरोपी सैय्यद मंजुर सैय्यद बिराम आणि त्यांचे साथीदारांनी वारंवार फिर्यादीचे फुफाचे डोक्यावर लोखंडी रॉडने मारहाण करुन त्यांना गंभीर जखमी केले. आरोपींनी फिर्यादीचे फुफा सैय्यद अयाज सैय्यद वाहेद यांची हत्या केली. फिर्यादीच्या रिपोर्टवरून दिनांक १०.११.२०२५ रोजी पोलीस ठाणे, डोणगांव येथे आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

०३] अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदारांचे विद्वान विधिज्ञ श्री. दिलदार खान यांनी युक्तिवाद केला की, आरोपी व फिर्यादी यांच्यात शेताच्या अनुषंगाने वाद आहे. वादातील शेत हे आरोपींच्या ताब्यात आहे. अर्जदार ह्या महिला असून त्यांचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नाही. अर्जदारांना जाणीवपूर्वक या खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे. फिर्यादी व इतरांच्या विरूद्ध देखील प्रती फिर्याद दाखल करण्यात आली आहे. भांडणाची सुरूवात देखील फिर्यादी यांच्यातर्फेच झाली असल्याने चिथावणी दिल्याने हा गुन्हा घडलेला आहे. फिर्याद ही मोघम स्वरूपाची असून अर्जदारांनी फिर्यादीचे फुफा सैय्यद अयाज याची हत्या केली असल्याचा आरोप नाही. कोणत्या अर्जदाराच्या हातात काठी किंवा रॉड होता याबाबत फिर्यादीत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथेबाबत संशय निर्माण होतो. या प्रकरणातील तपास संपलेला असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अर्जदारांना दिनांक ११.११.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून अर्जदार महिला या तुरूंगाधीन आहेत. अर्जदारांच्या कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. त्यामुळे अनिश्चित कालावधीकरिता अर्जदारांना कोठडीत ठेवणे आवश्यक नाही. अर्जदारांनी हत्या केल्याबाबत कोणताही पुरावा प्रथम दर्शनी दिसून येत नाही. अर्जदारांना नियमित जमानतीवर सोडल्यास, त्या न्यायालयाने लादून दिलेल्या कुठल्याही अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्यास तयार आहेत. तसेच अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहेत. त्यामुळे अर्जदारांना सशर्त जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली. अर्जदारांच्या वतीने खालील न्यायनिवाड्यांवर भीस्त ठेवण्यात आली.

[01] **Namra @ Shifa Akbarullah Khan & Ors Vs. State of Maharashtra, reported in 2025 ALL MR (Cri).**

[02] **Amol s/o Babasaheb Sonawne @ Sonu Fitter Vs. The State of Maharashtra & Anr., reported in 2023 ALL MR (Cri) 769.**

०४] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. एस. बी. इंगळे यांनी जमानत अर्जाला प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी युक्तिवाद केला की, अर्जदारांविरूद्ध हत्या केल्याचा आरोप असून घटनेच्या वेळेस अर्जदार हे मोक्यावर हजर होते व त्यांनी गुन्ह्यात सक्रिय सहभाग घेतला आहे. सर्व आरोपींनी पूर्व तयारी करून विचारपूर्वक हा हल्ला केलेला आहे.

अर्जदारांना जामीन दिल्यास अर्जदार साक्षीदारांवर दबाव आणून त्यांना फितूर करू शकतात व न्यायापासून पलायन करू शकतात. म्हणून अर्जदारांचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०५] दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने केस पेपरची आणि प्रकाशित न्यायनिवाड्यांची पाहणी केली. प्रकाशित न्यायनिवाडे **नम्रा उर्फ शिफा** आणि **अमोल सोनवणे उर्फ सोनु** या प्रकरणात महिला आरोपींचे कृत्य हे इतर आरोपींच्या कृत्यापेक्षा वेगळे होते, त्यांच्याकडून कोणतीही जप्ती करण्यात आली नव्हती व त्यांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याने त्यांना हत्या, हत्या करण्याचा प्रयत्न केलेल्या गुन्ह्यात जमानतीवर सोडण्यात आले. प्रस्तुत अर्जातील आरोपी ह्या महिला आहेत. त्यांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. फिर्यादी व त्याच्या नातेवाईकांविरूद्ध देखील अर्जदारांकडून प्रतिफिर्याद दाखल करण्यता आली आहे. प्रकरणातील कागदपत्र पाहता अर्जदारांकडून कोणतेही हत्यार जप्त करण्यात आलेले नाही. अर्जदारांवर कोणताही विशेष आरोप लावण्यात आलेला नाही. अर्जदारांवर सर्वसामान्य एकाच स्वरूपाचे आरोप लावण्यात आले आहे. अर्जदार घटनास्थळावर लोखंडी रॉड व काठी घेऊन हजर असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. परंतु अर्जदारांनी कोणत्या व्यक्तीला दुखापत केली किंवा मयताला घातक शस्त्राने मारहाण करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा आरोप फिर्यादीत अर्जदारांवर केलेला नाही. या प्रकरणात तपास पूर्ण होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. महिला अर्जदार ह्या दिनांक ११.११.२०२५ व दिनांक १३.११.२०२५ रोजी पासून तुरूंगाधीन आहेत. महिला आरोपींचे कृत्य हे इतर आरोपींपेक्षा भीन्न असल्याने प्रकाशित न्यायनिवाड्यातील तथ्य परिस्थिती व प्रस्तुत न्यायनिवाड्यातील तथ्य परिस्थिती यामध्ये साम्य आहे. त्यामुळे अर्जदारांना अधीक कालावधीसाठी तुरूंगाधीन ठेवणे न्यायोचित होत नाही. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भीती व साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केले जाऊ शकते. म्हणून प्रकरणातील, तथ्य परिस्थिती, अर्जदारांचे कृत्य, तपासाची स्थिती पाहता, अर्जदार सशर्त जामीन मिळवण्यास पात्र आहेत.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

**०१]** नियमित जामीन अर्ज (नि.क्र. ७) मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार क्र. **(१) आरेफाबी सय्यद मंजुर, (२) फरीदाबी सय्यद जमीर** आणि **(३) सुलताना बी सैय्यद रहीम** यांना पोलीस ठाणे, डोणगाव येथील अपराध क्र. २९५/२०२५, कलम १०३(१), १०९(१), १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), २९६, ३५१(२) सह कलम १९० भारतीय न्याय संहिता, खालील गुन्ह्यात त्यांचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचे जामीनदार दिल्यानंतर जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदारांनी अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०४]** अर्जदारांनी अभियोग पक्षाच्या साक्षीदारांसोबत कोणत्याही प्रकारे संपर्क साधु नये.

**०५]** अर्जदारांनी यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०६]** अर्जदारांनी वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.31 18:27:26 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**ठिकाण – मेहकर**
**दिनांक – ३१.०३.२०२६**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे  शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | – | श्री. सागर कृ मुंगीलवार,<br>अतिरिक्त सत्र न्यायाधीश मेहकर. |
| लघुलेखकाचे नांव | – | शेख इम्रान अब्दुल रऊफ,<br>लघुलेखक ग्रेड – १, मेहकर |

दिनांक –  ३१.०३.२०२६